**हरिप्रिया**

पाणवठ्याशी, श्याम सावळा, गाठतो, काढतो खोडी
वाट अडवितो, हात पकडतो, घागर माझी फोडी
ओलेती मी, जरा रुसूनी, सावरते, गोरे अंग
तरी उभा तो, नजर रोखुनी, हाती घेऊनी रंग
काय म्हणावे, कान्हाला या, काहीही, ना कळते
सासुरवाशीण, मथुरेची मी, मनातुनी तळमळते
रंग बावरा, घेऊन ऐसा, कशी गृहासी जाऊ
नटखट वेड्या, कृष्णाला या, कसे कसे समजाऊ
कधी विनवुनी, कधी दटावुनी, सुटका माझी करते
परि परतीच्या, वाटेवरती, कान्हाशी मन हरते
मनात वसतो, जनांत दिसतो, असा एक तो हरी
क्षणा क्षणाला, कणा-कणातुन, तोच तोच तो स्मरि
पुन्हा येतसे, उषा अधीरी, पाव्याच्या लहरी सवे
पुन्हा पाखरे, घेत भरारी, नभात उडती थवे
मी हि रिकामी, घागर घेऊनी, संमोहितशी निघते
अनाम ओढी, पाऊल फिरुनी, पाणवठ्याशी अडते

**- ©प्रीती देशपांडे**
www.meetiptreeti.com
Preeti@meetiptreeti.com